वाचा:- १) महाराष्ट्र शासन सार्वजनिक आरोग्य विभाग,शासन निर्णय क्र. बढती/२००२/प्र.क्र.२२५/सेवा-५,दि.२७ फेब्रुवारी २००३

२) म. उपसंचालक , आरोग्य सेवा, मुंबई यांचे कडील पत्र क्र. संआसे/शुश्रुषा/कक्ष-९/टे-३/एलएचव्ही/७०बॅ./२७८६-२८४६/२०१७, दि.१३/१०/२०१७

३) या कार्यालयाची मंजुर टिपणी दिनांक :-२४ / १० /२०१७.

---

## आदेश

**नाशिक जिल्हा परिषद नाशिक**
**आरोग्य विभाग**
**जा.क्र.जिपना/आरोग्य/आस्था-५/१३६४/१७**
**दिनांक - २४/१०/२०१७**

नाशिक जिल्हा परिषदेच्या अधिपत्याखालील काम करीत असलेल्या आरोग्य सेविका (महिला) ए.एन.एम यांची एल.एच.व्ही.प्रशिक्षणासाठी ०६ महिने कालावधीकरिता या आदेशान्वये **कामा व आलब्लेस रुग्णालय, मुंबई** येथे **दिनांक ०१ नोव्हेबर - २०१७** पासुन सुरु होणाऱ्या एल.एच.व्ही प्रशिक्षण बॅच क्र.७० साठी खालील आरोग्य सेविका (महिला) ए.एन.एम. यांची निवड करणेत येत आहे. संबधित प्रशिक्षणार्थीना प्रशिक्षणाचे ठिकाणी हजर होणेसाठी तात्काळ कार्यमुक्त करणेत यावे. दि. १० नोव्हेबर - २०१७ नंतर हजर करुन घेतले जाणार नाही यांची संबधिताना समज देणेत यावी.

| अ.नं. | आरोग्य सेविका संपूर्ण नांव | पदो.प्रवर्ग | रुजु दिनांक | कार्यरत तालुका |
|---|---|---|---|---|
| १ | श्रीम.सुनिता बुध्द वाल्मिक | अनु.जाती | दि.१५/११/१९८५ | त्र्यंबकेश्वर (मुलवड) |
| २ | श्रीम.अंजना नामदेव केदारे | अनु.जाती | दि.१८/११/१९९५ | येवला (मुखेड) |
| ३ | श्रीम.संगिता हरीकिसन गोपाळे | विजा-अ | दि.११/०५/१९९९ | कळवण (ओतूर) |
| ४ | श्रीम.चंदा रामभाऊ खताळे | खुला | दि.१६/०२/१९८५ | येवला (पाटोदा) |
| ५ | श्रीम.पुष्पा गोविंद शिंदे | खुला | दि.१९/०२/१९८५ | बागलाण (मुल्हेर) |
| ६ | श्रीम. संगिता सिताराम ठाकरे | खुला | दि.१४/११/१९८५ | सुरगाणा (मुलवड) |
| ७ | श्रीम.सुनंदा शिवराम शिरसाठ | खुला | दि.१५/११/१९८५ | बागलाण (ब्राम्हणगांव) |
| ८ | श्रीम.लक्ष्मीबाई धोंडीराम बागुल | खुला | दि.१५/११/१९८५ | सुरगाणा (बाऱ्हे) |
| ९ | श्रीम.स्मिता भालचंद्र पाटील | खुला | दि.१५/११/१९८५ | सिन्नर (ठाणगांव) |
| १० | श्रीम.मदाकिनी शिवाजी गायकवाड | खुला | दि.१५/११/१९८५ | येवला (भारम) |

**सदर ए.एन.एम. यांना ६ महिन्याचे प्रशिक्षणासाठी खालील अटीवर निवड करणेत येत आहे.**

१) महाराष्ट्र परिचर्या परिषद मुबई येथे सहाय्यक परिचारिका प्रसाविका (एएनएम) नोंदणीचे नुतनीकरण २०२२ पर्यंतचे व स्मार्ट कार्ड.
२) प्रशिक्षणार्थीचे आधार कार्ड, पॅन कार्ड, जात वैद्यता प्रमाणपत्र मुळ प्रतीसह छायांकित प्रती.
३) एस.एस.सी उत्तीर्ण व त्या नंतरचे शैक्षणिक अर्हता उत्तीर्ण बाबतचे मुळ प्रमाणपत्रे व छायांकित प्रती.
४) प्रशिक्षण कालावधीत कोणत्याही प्रकारची देय अनुज्ञेय रजा मिळणार नाही.
५) प्रशिक्षणाचे ठिकाणी हजर होणेपुर्वी शाळा सोडल्याचा दाखला,जातीचा दाखला,एस.एस.सी पास प्रमाणपत्र व मार्कसिट, रजिस्ट्रेशन व डिप्लोमा फॉर्म इत्यादी मुळ कागदपत्रे म.प्राचार्य यांना सादर करणे आवश्यक आहे.
६) प्रशिक्षणासाठी लागणारे वहया,पुस्तके व इतर स्टेशनरी स्वतः बरोबर न्यावयाचे असुन भोजनाचा व इतर खर्च आपणास स्वतः करावयाचा आहे.
७) यापुर्वी प्रशिक्षण झालेले नाहीत तसेच एस.एस.सी.पास व ५ वर्षे सेवेचा नियमित अनुभव असल्याची खात्री नंतरच प्रशिक्षणासाठी कार्यमुक्त करणेत यावे.
८) एस.एस.सी.नापास व स्ट्रम्पलेडर मिडवाईफ नापास असलेल्यांना कार्यमुक्त करणेत येऊ नयेत.
९) प्रशिक्षणाचे ठिकाणी आवश्यक ए.एन.एम. चा संपूर्ण गणवेशाचे साहित्य व राहण्याच्या आवश्यक ते सर्व साहीत्य घेऊन जाणे बाबत सुचना देणेत यावी.
१०) प्रशिक्षणासाठी केलेली निवड आपण नाकारल्यास पुन्हा निवड केली जाणार नाही.
**११) प्रशिक्षणार्थीने प्रशिक्षणासाठी दिनांक ०१ नोव्हेबर -२०१७ रोजी कार्यालयीन वेळेपुर्वी हजर होणे बंधनकारक असुन तदनंतर हजर करुन घेतले जाणार नाही.**
१२) प्रशिक्षणासाठी केलेली निवड कोणत्याही परिस्थितीत रद्द केली जाणार नाही.
१३) प्रशिक्षणार्थी कडुन कोणत्याही प्रकारचा रजेचा अर्ज अगर निवेदन स्विकारण्यात येऊ नये. व प्रशिक्षणासाठी निवड नाकारल्यास पदोन्नतीचे कोणतेही फायदे मिळणार नाही अशी समज देणेत यावी.
१४) *शासन निर्णय दिनांक २७ फेब्रुवारी २००३ अन्वये १२ वर्ष नियमित सेवा पुर्ण केलेल्या परंतु प्रशिक्षणाची संधी उपलब्ध न झालेल्या सहाय्यक परिचारिका प्रसाविकांना सेवा अंतर्गत आश्वासित प्रगती योजनेचा लाभ त्यांची १२ वर्षाची नियमित सेवा ज्या दिनांकास पुर्ण होईल त्या दिनांकापुसन अनुज्ञेय राहील. तथापी भविष्यात सेवा जेष्ठते नुसार विहीत प्रशिक्षण देण्यात आल्यावर ते पुर्ण करुन विहीत परिक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक राहील अन्यथा वरिष्ठ वेतनश्रेणीचे लाभ काढुन घेण्यात येईल.अशी तरतुद असल्याने या आदेशानुसारचे प्रशिक्षण नाकारल्यास शासन निर्णया नुसार कार्यवाही करणेत येईल.*

सदर आदेशानुसार उपरोक्त नामनिर्देशन केलेल्या प्रशिक्षणार्थीस **कामा व आलब्लेस रुग्णालय, मुंबई येथे दिनांक ०१ नोव्हेबर - २०१७** पुर्वी हजर होणेसाठी तात्काळ कार्यमुक्त करुन प्रतिनियुक्त करणेत यावे.

**(दीपक कुमार मीना)**
**मुख्य कार्यकारी अधिकारी**
**जिल्हा परिषद,नाशिक**

प्रत:- गट विकास अधिकारी (उ.श्रे.) पंचायत समिती नांदगांव /सिन्नर//त्रंबक /बागलाण/सुरगाणा/येवला/कळवण यांना कार्यवाहीसाठी रवाना
प्रत:- तालुका आरोग्य अधिकारी पंचायत समिती नांदगांव /सिन्नर//त्रंबक /बागलाण/सुरगाणा/येवला/कळवण यांना कार्यवाहीसाठी रवाना
प्रत:- वैद्यकीय अधिकारी ,प्राथमिक आरोग्य केंद्र ____________ता. नांदगांव /सिन्नर//त्रंबक /बागलाण/सुरगाणा/येवला

२/- संबधित प्रशिक्षणार्थी ६ महिन्याचे प्रशिक्षणासाठी मुबई येथे जात असल्याने त्यांचेकडील कार्यभार अन्य एएनएम यांचेकडेस सुपूर्त करणेत यावा.

प्रत:- म.अधिक्षक, कामा व आलब्लेस रुग्णालय, मुंबई यांना माहितीसाठी व योग्य त्या पुढील कार्यवाहीसाठी
प्रत:- म.उपसंचालक आरोग्य सेवा, (शुश्रुषा) आरोग्य भवन सेट जॉर्जेस रुग्णालय आवार पी.डिमेलो रोड, मुंबई - ४००००१ यांना माहितीस्तव सविनय सादर.